# आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविता

**डॉ. स्वाती मधुकर वाकोडे**
सहाय्यक प्राध्यापक
संताजी महाविद्यालय, नागपूर
swatirethe@gmail.com
९९७५५११४५०

**सारांश :—**

कविता हा वाङ्मयप्रकार आंबेडकरवादी ललित साहित्यातील पहिला जोरकस वाङ्मयप्रकार होय. कविता ही भावनेची भाषा होय. भावना ही मनाच्या स्पंदनातून प्रकटणारी नैतिकतेची आणि मूल्यभावाची भाषा असते. कवितेचा जन्म मानवी भावनेसोबत झाला याचा अर्थ कविता, भाषा आणि भावना या गोष्टी सहोदर आहेत. नृत्य करताना आदीमानवाच्या स्वरांना शब्दांची फुले आली. गीत जन्माला आले. गाणाऱ्या शब्दांना गाणाऱ्या व्यक्तीचे विवक्षित मन आणि या मनातील उत्कट गुंतागुंत प्रकट करता येऊ लागली आणि गीत कवितारूप धारण करू लागले. उत्स्फूर्त, उद्रेकी भावनाविष्कार प्रथम कवितेतून होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने जागृत झालेल्या प्रतिभा पहिल्यांदा सहजपणे कवितेच्या मुखातून बोलू लागल्या. विहीर उपसून झरे मोकळे करावेत त्याप्रमाणे आंबेडकरांच्या कार्याने आणि विचाराने केलेल्या मूलगामी मंथनाने बहिष्कृत प्रतिभांच्या मुक्त मानसिक जगण्याचा हा जिवंत आणि देखणा प्रारंभ होता. या मनांवरून हजारो वर्षापासूनचे निर्बंध उठले होते. हे होताच या मनातील प्रतिमांना पंख फूटले आणि त्या विद्रोही उडाणे घेऊ लागल्या.

या प्रतिभा फुलता यायला लागताच ज्वालांनी फूलू लागल्या. बोलता यायला लागताच माणुसकीसाठी आकांत मांडू लागल्या. हे नैसर्गिक होते हे स्वाभाविक होते. बोलण्यावरची बंदी उठली, पंखाला बांधून ठेवणारी बंधने तुटली आणि या प्रतिभा धबधब्यासारख्या ओसंडून बोलू लागल्या. त्यांना लोळागोळा करणाऱ्या त्यांचे पंख जाळणाऱ्या आणि मनांना ठेचून काढणाऱ्या धर्माविरूद्ध, परंपरांच्या आणि रूढींच्याविरूद्ध तत्वज्ञाने आणि संस्था यांच्याविरूद्ध अशा सर्वच मानवताविरोधी संचिता विरूद्ध या प्रतिभा बोलू लागल्या. जळजळते नकार त्या पाशवी संचितावर उधळू लागल्या.

**प्रस्तावना :—**

डॉ. आंबेडकरांनी उभारलेले मानवमुक्तीचे आंदोलन अत्यंत मूलगामी होते. या देशातील विषमतासंस्कृतीच्या विरूद्ध एका संपूर्ण आणि सुसंगत अशा नव्या संस्कृतीची मांडणी आंबेडकरांनी केली. या नव्या ज्वलंत संस्कारातून नव्या परिवर्तनवादी जाणिवांचा अंगार मनामनात भडकला. आंबेडकरवादी कवितेला इथल्या दडपलेल्या माणसांचे दु:ख दिसले. आंबेडकरवादी प्रतिभांनी बुद्धाच्या डोळ्यांचा वसा पत्करला आणि त्यांना पीडितांचे दु:ख दिसले, दु:खी दिसले, दु:ख देणारे सर्व दिसले. या सर्वच अमानुषतेची मीमांसा दिसली. आंबेडकरवादी प्रतिभांनी आंबेडकरांच्या मनाने पाहिले आणि त्यांना येथील शोषणाचा नकाशा दिसला विषमतेची भयानक रूपरेषा दिसली. विषमता कधी संपणारच नाही अशी निर्दय तरतूद असलेली कर्मविषाकाचे रसायन जन्माला घालणाऱ्या प्रयोगशाळेची पशूता त्यांच्या लक्षात आली. या

कर्मविषाकाची सूत्रे पवित्र मानणारी इथली समाजव्यवस्था येथील माणुसकीच्या विटंबनेला जबाबदार आहे याचे भान त्यांच्या मनात जागले. आंबेडकरवादी कवितेने मराठी कवितेतही आणि साहित्यातही एक नवे प्रकाशपर्व सुरू केले. एका मूलगामी क्रांतीकाराला जन्म दिला. यामधूनच आंबेडकरवादी कवयित्रीही निर्माण झाल्या.

स्त्रीचे शोषण करणाऱ्या समाजरचनेचे, तिच्या मूल्यसरणीचे स्वरूप काय आहे. धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि लैंगिक असे सर्व पातळीवर स्त्रीयांचे शोषण करणारी समाजरचना समजावून घेणे आवश्यक आहे. स्त्रीला तिच्या गुलामीचा गौरव आणि दुय्यमत्वाला सन्मान मानायला शिकविणारी ही समाजरचना एखाद्या अवघड कोड्यासारखी आहे. धर्माने स्त्रीला गुलामीने मंडित केले पण त्या धर्माचा तिला केवढा तरी गर्व वाटतो. उच्चवर्णाची स्त्री शूद्र असते. शोषितांची स्त्री तर अतिशूद्र किंवा गुलामांची गुलाम असते. हिंदूकोडबिल या तिच्या मुक्तीच्या जाहीरनाम्याविरूद्ध स्त्रियांनीच मोर्चा काढला होता. अलिकडच्या काळातही नवहिंत्ववादी संघटनांमध्ये स्त्रिया बहुसंख्येने सहभागी होताना दिसतात. ओबीसी स्त्रियांच्या आरक्षणाला उच्चवर्णीय स्त्रिया विरोध करतात. मंडल विरोधकांमध्ये सामील होतात. धर्मात स्थान मागितले जाते.

**आंबेडकरवादी कवयित्रीच्या कविता :—**

स्त्रियांवर केवढी बंधने लादली होती जातीत विवाह, बालविवाह, विधवाकेशवपन, सतीप्रथा, पुनर्विवाहास बंदी, शिक्षणबंदी या सर्व बंधनांनी स्त्रीचे पंखच पार कापून टाकले होते. माणुसपणाशी तिचे वियोगीकरण झाले होते. जोतीराव आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीमुक्तीसाठी मूलभूत पातळीवरून कार्य केले. डॉ. आंबेडकरांनी विधीविधानाच्या पातळीवरून स्त्रीच्या मुक्तीचा जाहीरनामा सादर केला. देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांना, मजुरी करणाऱ्या स्त्रियांना आणि अज्ञानाच्या अंधारात बुडालेल्या स्त्रियांना आणि एकूणच गुलामीच्या शृंखलांनी स्वत:ला बांधून घेतलेल्या स्त्रियांना आंबेडकरांनी मुक्तीचा प्रकाशमार्ग दाखविला तिच्या विषमतेचे सर्व दोरच कापून टाकले. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या युगवाल्याने आग पसरविली आणि स्त्रीया शिकू लागल्या. अनेक स्त्रिया शिकल्या. पुरूषाबरोबर कर्तृत्वाच्या क्षेत्रात वावरू लागल्या. छोटी—मोठी मानाची पदे भूषवू लागल्या. बहि  कृत समाजातील स्त्रिया शिक्षिका झाल्या. कार्यकर्त्या झाल्या. आणि अनेक स्त्रिया परिवर्तनाची संस्कृती निर्माण करणाऱ्या साहित्यनिर्मितीतही सामील झाल्या. सुंगधा शेंडे यांचे 'विरतं धुकं', 'आम्रपाली भावपल्लवी' आणि 'अग्निशिखा' हे तीन काव्यसंग्रह आहेत. स्वातंत्र्य मिळूनही 'मन जळतं का?' हा प्रश्न ही कवयित्री विचारते दारिद्र्य असले तरी शिक्षण सोडायचे नाही असे —

> "असो अंगावरी चिंध्या खाईना का कण्याभाकरी
> घरात लावील विद्येची पणती बोल घुमूदे तुझ्या अंतरी"

या शब्दांमधून कवयित्री 'आम्रपाली भावपल्लवी' मध्ये सांगते. आंबेडकरवादी कवयित्री ही सर्वच प्रकारच्या भेदभावांना मूठमाती देऊ इच्छिते. म्हणूनच सुगंधा शेंडे —

> "कणकण पिऊनी तव तेजाचा
> रोम रोम तेजाळून यावा
> या तेजाच्या प्रज्वलतेने
> विलया न्यावे भेदभावा"

अशी आपल्या आयुष्याची आणि काव्याची प्रतिज्ञा चेतवून ठेवतात कवयित्री हिरा बनसोडे यांचे 'पोर्णिमा (१९७०)' आणि 'फिर्याद (१९८४)' हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. एकूणच आंबेडकरवादी कवितेत हिराबाई यांच्या कवितेला मानाचे स्थान आहे. बहिष्कृत म्हणून आणि स्त्री म्हणून कवयित्रीच्या वाट्याला आलेले अनुभव त्यांच्या काव्यातून बोलके होतात. या देशात स्त्री गुलाम आहे. तिच्या स्वप्नांची मुक्त पाखरे मारली जातात. हिराबाई म्हणतात –

"ही माझी फिर्याद
आमच्या कर्मठ संस्कृतीवर आहे
जिने आम्हाला बंद कोठडीत कैद केले आहे.....
... ही लढाई अटळ आहे..... अटळ आहे."

अशी युद्धाची अटळता मांडून ठेवतात.

ज्योती लांजेवार या आंबेडकरवादी कवितेतील तिसऱ्या महत्त्वाच्या कवयित्री होत. त्यांचे 'दिशा' आणि 'शब्दनिळे आभाळ' हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. अस्पृश्य आणि स्त्री अशा दुहेरी भोगवट्याचे आक्रंदन ज्योती लांजेवार यांच्या कवितेतूनही प्रभावीपणे व्यक्त झाले आहे.

सुरेखा भगत यांचा 'साक्ष' हा पहिला संग्रह अलीकडेच प्रकाशित झाला. भोवतीच्या दु:खाने सुरेखा भगत यांचेही मन विव्हळ झाले आहे त्या म्हणतात –

"जिथे दिशांचा येतो आक्रोश कानावर
तेथील मुक्यांची अगतिकता साहू
चल तिथे जाऊ"

पण याहीपेक्षा त्या दु:खाचे उगमच बंद करण्याची भूमिका घेतात. बुद्धाच्या आणि बाबासाहेबांच्या क्रांतीसूत्रांना अवलंबिणारी आणि दु:खमुक्तीच्या रसायनाचा अंगिकार करणारी ही कविता.

"दु:खितांचे आसू पुसण्याऐवजी
आसू येणेच थांबविले पाहिजे."

असे म्हणते ते मोठे अन्वर्थक आहे. एकूण सुरेखा भगत या कवयित्रीची कविता संयमशील स्वभावाची आहे. शांत मनाचे अनुभव ती मांडते.

प्रज्ञा लोखंडे यांचा 'अंत:स्थ' हा काव्यसंग्रह आंबेडकरवादी कवितेतील एक महत्त्वाचा काव्यसंग्रह आहे. परंपरेच्या चिरेबंदी वाड्याला हादरे देत आंबेडकरवादी कवितेचे वादळ आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या कवितेला 'अत्त दीप भव' ची क्रांतीदिशा दिली होती. ही स्त्रीमुक्तीची दिशा होती. धर्म, रूढी, संस्कार, परंपरा अशा कोणत्याही रूपात वावरणारे पिंजरे आंबेडकरवादात मान्य नाहीत. हे पिंजरे स्त्रिला आणि असंख्य पुरूषांनाही माणूसपणापासूनच वंचित करून ठेवतात. आंबेडकरवादाने प्रज्ञा लोखंडे यांच्याही प्रतिभेला हे 'अतं:स्थ' भान दिले आहे.

"आपल्यातच किती अंतस्थ कप्पे
वावरत असतात
एकमेकांना अनोळखी असतात...."

असे म्हणणारी ही कवयित्री स्त्रीमनाचे हे कप्पे या नेणिवा शब्दातून फुलविण्याचा वसा घेते.

'मला हवी असणारी पहाट' हा प्रतिभा राजानंद यांचा आंबेडकरवादी कवितेला स्त्रीवादाचा नवा सुंदर आयाम देणारा कवितासंग्रह.

उषाकिरण आत्राम यांचा 'म्होरकी' हा कवितासंग्रह १९९७ साली प्रकाशित झाला. उषाकिरणच्या प्रतिभेने फुलवलेले हे काव्यलावण्य मोठे भेदक आहे. 'स्वतंत्र भारता! आम्हास मिळलेला न्याय' असा जिवंत प्रश्न ती स्वातंत्र्यावर भिरकावते पण या कवयित्रीला हेही दिसते की आता लढाई आपणच जन्माला घातली पाहिजे.

"मक्तेदारी चालणार नाही
ब्राम्हणशाली चालणार नाही
आम्ही नाहीत हिंदू
आम्ही आहोत कायतूर
आमचा प्रकाश आम्हीच होवू!"

कवयित्रीला आपल्याला कोणाशी लढायचे आहे? लढाईत कोणते मुद्दे असणार आहेत याची जाण आलेली आहे. स्वत:चे अस्तित्व स्वत:च निर्माण करण्याचा, अतदीपभवचा क्रांतीसंदेश तिने तिने जळत्या उरात साठवलेला आहे.

कुसुम आलाम या आदीवासी भगिनीचा 'रानआसवांचे तळे' हा लक्षणीय काव्यसंग्रह १९९८ साली प्रकाशित झाला. तसेच उल्हासिनी कांबळे यांच्या 'हरवलेला किनारा' (१९९१) या कवितासंग्रहातून पतीच्या अकाली देहावसानाचे जीवघेणे दु:ख प्रामुख्याने व्यक्त होते.

**निष्कर्ष :—**

या आणि अशाच अनेक कवयित्रींनी आंबेडकरवादी कविता समृद्ध केली आहे. बहिष्कृत समाजातील स्त्रीमनांनी केलेली संस्कृती समीक्षा वर्तमान काळातील भोगवट्याचा आलेख आणि मूलगामी परिवर्तनासाठी घेतलेला आंबेडकक्रांतीचा वसा असे या कवयित्रींच्या काव्याचे स्वरूप आहे.

**संदर्भ ग्रंथ :—**

१. आंबेडकरवादी मराठी साहित्य — यशवंत मनोहर, भीमरत्न प्रकाशन, १९९९
२. साहित्य शोध आणि संवाद — डॉ. मनोहर जाधव, संपा. सुविधा प्रकाशन, पुणे आगस्ट २०००
३. फिर्याद, हिरा बनसोडे, समाजप्रबोधन, पुणे, मार्च १९८४ मनोगत.
४. म्होरकी, उषाकिरण आत्राम, गोंडवाना गोंडी साहित्य परिषद, नागपूर २२ फेब्रुवारी १९९७
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समग्र भाषणे, खंड ८, संपादक प्रदीप गायकवाड, क्षितीज पब्लिकेशन, नागपूर, द्वितीय आवृत्ती, २००६